पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन

# पूर्णमिदं

VOLUME II ISSUE III MAY-JUNE 2020







अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| पूर्णमच्या उपक्रमांविषयी | २ |
| फोटो गॅलरी | ३ |
| जागतिक पर्यावरण दिन – समीक्षा | ४-५ |
| पर्यावरण शब्दकोडे | ६ |
| चला करूया जैविक विविधता नोंदवही! | ७-९ |
| पूर्णमविषयी प्रतिक्रिया | ९-१० |


## संपादकीय

कोरोनाचा प्रादुर्भाव संपूर्ण महाराष्ट्रात वाढत आहे. अशा कठीण परिस्थितीमध्येही आरोग्याची काळजी घेत आपापल्या कार्यक्षेत्रात काम करत राहण्याचा आपण सर्वच जण करतो आहोत. एक सामाजिक संस्था म्हणून पूर्णमनेही कचरा व्यवस्थापन आणि महिलांना रोजगार निर्मिती करण्याचे काम नेटाने चालू ठेवले आहे. सोसायटी स्तरावर नागरिकांनी पुढाकार घेऊन इ-कचरा व प्लास्टिक गोळा करावे आणि संस्थेकडे द्यावे असे आवाहन पूर्णमने केले. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून ३ सोसायट्यांमध्ये आणि ३ साप्ताहिक केंद्रांवर मिळून एकूण ५७३ किलो इ-कचरा व १४७ किलो प्लास्टिक संकलित झाले.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सर्व सुरक्षा साधनांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातही मास्कची गरज प्रामुख्याने आहे. पूर्णम गेल्या ४ महिन्यांपासून पर्यावरणपूरक मास्क महिला बचत गटांच्या माध्यमातून बनवीत आहे. आतापर्यन्त पूर्णमने ९०००० हून अधिक मास्क बनविले आहेत. यामध्ये १२० महिलांना रोजगार उपलब्ध केला आहे. मास्कबरोबरच इतर सुरक्षा साधनांचीदेखील गरज निर्माण झाली आहे. विशेषतः कामावर जाणाऱ्या महिलांसाठी सुरक्षा साधने हवीच. घरातीलच जुन्या सुती कापडापासून बनविलेली साधने असतील तर पर्यावरणाच्या दृष्टीनेही पूरक ठरतील. याचाच विचार करून पर्यावरणपूरक १००% सुती कापडाचे मास्क, एप्रन आणि टोप्या बनविण्याचा उपक्रम हाती घेतला. यामध्ये नागरिकांनी त्यांच्याकडचे कापड द्यावे आणि त्यापासून सुरक्षा साधने आमच्याकडून बनवून घ्यावीत. असे करणे शक्य नसल्यास रेडीमेड कापडापासून सुद्धा ही साधने बनविली जातील.

कोव्हीड-१९ शी सामना करत आपले पोलीस बांधव आपल्या सेवेसाठी अहोरात्र काम करत आहेत. त्यांच्या मदतीसाठी ग्रीन अर्थ इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेसोबत पूर्णमने निधी संकलनाचे अभियान सुरु केले आहे. याद्वारे आवाहन करत आहोत की कमीत कमी १०० रुपयापासून ऐच्छिक रक्कम निधी म्हणून देऊ शकतात.

पूर्णमने रक्षाबंधनानिमित्त आणखी एक संकल्पना आणली आहे. यामध्ये जुनी जीन्स देऊन त्यापासून पर्सेस, बँक पॅक, हँड बॅग, टोटे बॅग इत्यादी आकर्षक वस्तू बनविल्या जातील. जीन्सच्या कापडाच्या प्रतीनुसार आणि ग्राहकांच्या पसंतीनुसार वस्तूंचे प्रकार निवडता येऊ शकतात. त्यायोगे रक्षाबंधनानिमित्त बहिणींना भेट म्हणून देण्याजोग्या पर्यावरणपूरक वस्तू तयार होतीलच शिवाय गरजू महिलेला मदत करता येईल.

या उपक्रमांमध्ये सामील होण्याबरोबरच "पूर्णाहुती" या संकल्पनेद्वारे नागरिक आर्थिक देणगी देऊ शकतात. रोज एक रुपया याप्रमाणे वर्षभरासाठी रु. ३६५/- किंवा ३६५ च्या पटीमध्ये इच्छेनुसार योगदान देऊ शकतात. हा निधी पूर्णमद्वारे चालणाऱ्या विविध उपक्रमांसाठी गरजेनुसार वापरण्यात येईल. रक्षाबंधनाच्या निमित्ताने "पूर्णमिदं" चा यावर्षीचा तिसरा अंक प्रदर्शित करत आहोत. यामध्ये पर्यावरणदिन आणि जैवविविधता दिन या विषयांवर आधारित अनुक्रमे डॉ. श्रद्धा कारीकर, मेधावी तडवळकर - अमृता जोगळेकर यांनी लिहिलेले लेख सामाविष्ट आहेत तसेच पूर्णमबरोबर काम करणाऱ्या स्वयंसेवकांनी कामाचा अनुभव विषद केला आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरण शब्दकोडे' समाविष्ट आहे. अधिकाधिक लोकांपर्यंत हा अंक पोहोचवण्यास अवश्य सहयोग द्यावा. तसेच या अंकावर आपल्या प्रतिक्रिया नक्की पोचवाव्यात ही विनंती.

- **संपादकीय मंडळ**

**पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन**

## पूर्णमच्या उपक्रमांविषयी

एप्रिलपासून महिला बचत गटांच्या माध्यमातून सुती मास्क तयार करण्याचे व गरजेनुसार स्वयंसेवकांमार्फत वाटप करण्याचे काम पूर्णम करते आहे. आत्तापर्यंत ९०००० हून अधिक मास्क बनविले आहेत. सुती मास्क बनविण्याबरोबरच १००% सुती कापडाचे हँडग्लोव्हज विक्रीसाठी उपलब्ध केले आहेत. आताच्या काळात नोकरीसाठी बाहेर पडणाऱ्या गृहसख्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी खास एक आगळी कल्पना राबविली. सर्वच सुरक्षा साधने वापरण्याची वाढती गरज लक्षात घेता ती पर्यावरणपूरक असणेही महत्वाचे आहे. जुने बेडशीट्स, ड्रेस मटेरियल, शर्ट पीस अथवा ओढण्या यांपासून एप्रन, मास्क, हँडग्लोव्हज आणि कॅप अशी सुरक्षा साधनांची निर्मिती करण्यास पूर्णमने सुरुवात केली आहे.

पर्यावरण दिनाच्या निमित्ताने पूर्णमतर्फे आवाहन करण्यात आले की सोसायटी स्तरावर पदाधिकारी व रहिवाशांनी इ-कचरा व प्लास्टिक शनिवारी किंवा रविवारी गोळा करून ठेवावे. संस्थेतर्फे घेऊन जाण्याची व्यवस्था केली जाईल. जून महिन्यात ३ सोसायट्यांमध्ये इ-कचरा व प्लास्टिक संकलन झाले. महिनाभरात ३ साप्ताहिक संकलन केंद्रे सुरु होती. या संकलन मोहिमांमधून ५७३ किलो इ-कचरा व ५७ किलो प्लास्टिक संकलित झाले.

कमिन्ससोबत फलटणनजीकच्या सासवड गावामध्ये महिला बचत गटाच्या माध्यमातून स्वस्त दरातील सॅनिटरी नॅपकीन्स बनवून त्यांची विक्री केली जाते. गावातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि महिलांचे आरोग्य राखणे ही या प्रकल्पाची उद्दिष्ट्ये आहेत. या प्रकल्पाच्या अंतर्गत सुमारे ४३३४ सॅनिटरी नॅपकीन्स बनविले गेले व ३२८० नॅपकीन्सच्या पाकिटांची विक्री झाली.

याव्यतिरिक्त पूर्णमतर्फे २३ सायकली जनकल्याण समितीला देणगी स्वरूपात देण्यात आल्या. या सायकली पुढे गरजूंपर्यंत पोहोचवण्याचे मोलाचे काम समितीतर्फे केले जाणार आहे. यामध्ये जनकल्याण समितीकडून संदीप गुजर आणि किरण मोहोळ यांचा सहभाग होता.

ग्रीन अर्थ इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेसोबत पूर्णमने पुणे शहरातील १०० पोलीस चौकींमध्ये मास्क डिस्पोजल मशीन बसविण्यासाठी निधी संकलानाचे अभियान हाती घेतले आहे. याद्वारे नागरिकांना आवाहन केले आहे की कमीत कमी १०० रुपयापासून ते ऐच्छिक रक्कम निधीमध्ये जमा करावी आणि यामध्ये सहभागी व्हावे. यासाठी https://www.ketto.org/used-mask-disposal-facility-for-police-force-in-pune या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन निधी जमा करता येईल.

# फोटो गॅलरी





*इ-कचरा व प्लास्टिक कचरा संकलन मोहीम*







*साप्ताहिक संकलन केंद्रे*







*सायकल डोनेशन*

# जागतिक पर्यावरण दिन: समीक्षा




"जागतिक स्तरावर १९६०-७० दशकात नैसर्गिक संसाधानांबाबातच्या ऱ्हासाची जागरुकता निर्माण व्हायला सुरुवात झाली. मानव आणि पर्यावरण यांच्यातील संबंध, त्यांचे संरक्षण व संवर्धन यांचा आढावा घेण्याच्या उद्देशाने १९७२ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने स्वीडनमधील स्टॉकहोम शहरात जागतिक परिषद आयोजित केली गेली."



मधु वाता ऋतायते मधुं क्षरन्तिसिन्धवः।
माध्वीर्नः संतोषधीः॥
मधु नक्तमुंतषोमधुमत्पार्थिवं रजः।
मधु द्यौरस्तु नः पिता॥
मधुमान्नो वनस्पतीर्मधुमान अस्तु सूर्यः।
माध्वीर्गाहोभवन्तु नः॥

ऋग्वेदातीलया उक्तीनुसार निसर्गाने मानवी जीवन आरोग्यसंपन्नव सुखसमृद्ध होण्यासाठी वारा, पाणी, वनौषधी, सूर्यप्रकाश व अन्न संसाधनांची मुक्त उधळण केली आहे.

मानव हा पर्यावरणाचाच एक कुशल घटक आहे. मानवाने उपलब्ध साधनांचा उपयोग मूलभूत गरजा भागवून आपला विकास साधण्यासाठी करावयाचा आहे. संसाधनांवर कोणताही मालकी हक्क न दाखवता उत्तम विश्वस्ताप्रमाणे त्यांचे जतन करून ती मूळ स्वरूपात पुढील पिढीला सुपूर्त करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. सद्यस्थितीत मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढतो आहे. नैसर्गिक साधनांच्या अनियंत्रित वापरामुळे पृथ्वीवरील अजैविक व जैविक घटकांची कायमस्वरूपी हानी होत आहे.

जागतिक स्तरावर १९६०-७० दशकात नैसर्गिक संसाधानांबाबातच्या ऱ्हासाची जागरुकता निर्माण व्हायला सुरुवात झाली. मानव आणि पर्यावरण यांच्यातील संबंध, त्यांचे संरक्षण व संवर्धन यांचा आढावा घेण्याच्या उद्देशाने १९७२ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने स्वीडनमधील स्टॉकहोम शहरात जागतिक परिषद आयोजित केली गेली. ही परिषद ५ ते १६ जून या कालावधीत संपन्न झाली. सर्व राष्ट्रांच्या सहभागाने पर्यावरणीय समस्यांचे अवलोकन व संसाधन संरक्षणाच्या गरजा यांच्या दृष्टीने कृती आराखडा बनविण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. त्यानंतर १५ डिसेंबर १९७२ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने एक ठराव मंजूर केला; त्यात परिषदेचा पहिला दिवस म्हणजेच ५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून नियुक्त करण्यात आला. पर्यावरणविषयक समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता आणि पर्यावरणपूरक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे. जगभरातील १०० पेक्षा जास्त देश हा दिवस दरवर्षी साजरा करतात.


संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दरवर्षी जागतिक पर्यावरणदिनानिमित्त एक संकल्पसूत्र जाहीर केले जाते. त्याच विषयाला अनुसरून सर्व देशांत विविध उपक्रम वर्षभर राबविले जातात. १९७४ मध्ये प्रथम पर्यावरण दिन साजरा झाल्यापासून जागतिक ओझोन थर कमी होणे, विषारी रसायने, वाळवंटीकरण, जंगलांचा ऱ्हास, वैश्विक तापमानवाढ, हवामान बदल इत्यादींसारख्या वाढत्या चितांबाबत जागरूकता वाढविण्यास मदत झाली. आंतरराष्ट्रीय जैवविविधता वर्ष, शांतता वर्ष यांचाही यात समावेश करण्यात आला.

पर्यावरण दिन संकल्पसूत्र प्रभावीपणे राबविण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सहमतीने १९८६ नंतर विविध देशांना संकल्पसूत्राचे यजमानपद दिले गेले. यांत सर्व विकसित, विकसनशील व कमी विकसित देशांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यात आला.









# जागतिक पर्यावरण दिन: समीक्षा

आत्तापर्यंत भारत, ब्राझील, केनिया, ऑस्ट्रेलिया, नॉर्वे यांसारख्या २० पेक्षा अधिक देशांनी हे यजमानपद भूषविले आहे. जैवविविधता हे यंदाचे संकल्पसूत्र असून त्याचे यजमानपद कोलंबिया राष्ट्राकडे देण्यात आले आहे. पर्यावरणविषयक समस्यांवर विचारमंथन करणे, सामान्य नागरिकांत जागरुकता निर्माण करणे आणि विशिष्ट कृतीआराखड्यांद्वारे ठोस उपाययोजना करण्यासाठी हा दिवस जागतिक व्यासपीठावर विकसित होत आहे. वर्षानुवर्षे लाखो लोकांनी यात सहभाग घेतला असून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धोरणांत सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत केली आहे.


भारतात केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून दरवर्षी पर्यावरण दिवस साजरा करण्यात येतो. विविध शैक्षणिक, स्वयंसेवी, शासकीय तथा निमशासकीय संस्था; संशोधन केंद्रे व उद्योगसमूह यांच्यामार्फत राज्य तसेच स्थानिक पातळीवर विविध उपक्रम राबविले जातात. पर्यावरण दिनाचा शिक्षण व जनजागृती हा मुख्य उद्देश असला तरी संकल्पसूत्राशी निगडीत प्रकल्प राबविणे, प्राथमिक स्तरावर माहिती गोळा करणे, शोधनिबंध प्रसिद्ध करणे, समस्यांवर कल्पक उपाययोजना सुचविणे अशा अनेक बाबी याद्वारे साध्य होतात. जटील समस्यांचा अभ्यास उपक्रमांना गती मिळविण्यासाठी कालमर्यादित निधी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय घटकांद्वारे उपलब्ध केला जातो.

२०१८ साली जागतिक पर्यावरण दिनाचे यजमानपद भारताकडे देण्यात आले होते. 'प्लास्टिक प्रदूषणाशी लढा' असे त्याचे संकल्पसूत्र होते. प्लास्टिक कचरा समस्यांचा ऊहापोह करून जनजागृती, प्लास्टिकपासून इंधननिर्मिती, विघटनासाठी शास्त्रीय पर्यायांचा शोध अशा विविध गोष्टींचा यानिमित्ताने सखोल अभ्यास केला गेला. तसेच प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमावली २०१६ यांत सुधारणा करण्यात आली.

पर्यावरण रक्षणाचे वैश्विक विचार स्थानिक पातळीवर राबविले गेले तरच एकसंध व संतुलित दृष्टीकोन प्रत्येक व्यक्तीत निर्माण होईल. यात समाजापासून सुरु झालेला विचार व्यक्तिगत पातळीवर कृती स्वरूपात उतरवणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संरक्षणासाठी नियमितपणे केलेली छोटी कृती सुद्धा मोठा बदल घडवू शकते. समस्यांचे भान राखून सजगतेने कृती केल्यास आपण प्रदूषण व हवामान बदलाच्या मायावी राक्षसाला नक्कीच रोखू शकतो. हीच आपण येणाऱ्या पिढीला व पर्यायाने वसुंधरेला दिलेली शाश्वत भेट असेल आणि 'जागतिक पर्यावरण दिना' चा उद्देश सफल होईल.

**- डॉ. श्रद्धा प्रसाद कुलकर्णी**
**पर्यावरणशास्त्र विभाग,**
**फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे**

# पर्यावरण शब्दकोडे




**आडवे शब्द-**


वातावरणातील असे वायू जे इन्फ्रारेड किरण शोषून घेतात व त्याचे उत्सर्जन करतात

वातावरणात, पाण्यात, हवेतकिंवा अन्नातसजीवांना हानिकारक असे पदार्थ मिसळण्याची क्रिया

**उभे शब्द-**

पृथ्वीवरील विशाल जीवसंहतीचे एकक

पृथ्वी आणि इतर ग्रह व मोठे उपग्रह यांच्या भोवतालचे अनेक वायूंच्या मिश्रणाचे आवरण




**Down-**

1. A distinct ecosystem that is flooded by water either permanently or seasonally
2. An action or practice of using an item more than once for its original purpose or to fulfill a different function

**Across-**

1. Site for disposal of waste material
2. Special day celebrated worldwide on 8th June
3. A long, high sea wave caused by earthquake or other disturbance




असमुचित आणि गरज सताना केलेल्या अतिरिक्त ाहनामुळे जगभरातील अनेक थानिक परिसंस्था नष्ट ाल्या आहेत आणि त्याचे रिणाम जेवढे जागतिक ातळीवर दिसत आहेत, वढेच स्थानिक पातळीवर खील दिसायला लागले ाहेत. “



International Day for Biological Diversity

## चला करूया जैविक विविधता नोंदवही!!

संयुक्त राष्ट्राने २०११-२०२० हे दशक ‘Decade on Biodiversity’ म्हणजेच जैवविविधता दशक म्हणून साजरे केले. नुकताच २२ मे ला जैवविविधता दिवस होऊन गेला. कोरोनाच्या संकटामुळे अनेक निसर्गप्रेमी लोकांनी घरूनच पक्षी निरीक्षण, वनस्पती निरीक्षण, कीटक निरीक्षण करत त्याची नोंद करून जैवविविधता दिवस साजरा केला. काही लोकांचा असा समज झाला होता कि जैवविविधता फक्त गावातच असते शहरात कुठून आलीये पक्षी-प्राणी वैविध्य!! पण कोरोनाच्या निमित्ताने आपण डोळसपणे आपल्या नजीकच्या परिसरात घरात बसून बघायला लागलो तेंव्हा कळू लागले कि फक्त कबुतर, घार, कावळा एवढेच पक्षी नसून अनेक छोट्या चिमण्या आपल्या आसपास राहतात. जैववैविध्य हे अगदी डोळ्यांना न दिसणाऱ्या सूक्ष्मजीवांपासून बहुपेशीय वनस्पती प्राण्यांपर्यंत सर्वदूर पसरले आहे. रानभाज्यांपासून ते पिकांचे वाण व पाळीव प्राण्यांच्या प्रजाती असा जैवविविधतेचा विस्तार आहे! आपण मनुष्य देखील त्याच जैववैविध्याचा भाग आहोत हे विसरून चालणार नाही! गरजेपेक्षा जास्त ओरबाडून घेण्याच्या वृत्तीमुळे आपल्याला आपण परिसराचे मालक आहोत असे वाटायला लागले आहे. असमुचित आणि गरज नसताना केलेल्या अतिरिक्त दोहनामुळे जगभरातील अनेक स्थानिक परिसंस्था नष्ट झाल्या आहेत आणि त्याचे परिणाम जेवढे जागतिक पातळीवर दिसत आहेत, तेवढेच स्थानिक पातळीवर देखील दिसायला लागले आहेत.

सगळ्यात मोठा प्रश्न हा आहे की जैववैविध्य गमावत असताना आपल्याला कळतच नाही की आपण नक्की काय गमावत आहोत. गेल्या काही दशकात जवळपास १ दशलक्ष जीव हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. प्रत्येक जीवजंतू हा परिसंस्थे मध्ये काही ना काही भूमिका बजावत असतो. ह्या जीवजंतूची ओळख आपल्याला झाल्याशिवाय त्याचे महत्व पटवून देणे अवघड होणार आहे. भारतासारख्या प्राचीन संस्कृतीमध्ये आपल्या आसपासच्या परिसरामधील वनस्पतींना व प्राणीमात्रांना माणसाच्या जीवनाचा भाग बनवला आहे. कधी ते देवराई स्वरूपात राखलेले वन असेल तर काही ठिकाणी नदीपात्रात मासेमारी बंद केली असेल. विविध भागांमध्ये प्रत्येक नैसर्गिक संसाधनाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने होतो. बऱ्याच सण उत्सवात देखील आपल्या घराच्या आसपास सापडणाऱ्या वनस्पतींचा समावेश आढळून येतो. उदाहरणार्थ- २१ प्रकारच्या गणेशपत्री, दसऱ्याला दाराला लावण्यात येणारे कुर्डू सारख्या स्थानिक रान वनस्पती व खरीपात आलेली पिकाची पहिली लोंबी. अजूनही अनेक गावांमध्ये छोट्या आजारांकरिता आसपासच्या जंगलात आढळणाऱ्या वनस्पती वापरून औषध दिले जाते.










## चला करूया जैविक विविधता नोंदवही!!

ह्या दैनंदिन जीवनातील गुंफणामुळे आपोआपच माणूस हा परिसराचाच एक भाग राहिला. जल, जंगल, जमीन, जनावर ह्यांचे गरजेपेक्षा जास्त दोहन करायला लागल्यामुळे परिसराबरोबरचे नाते बिघडत गेले. हे नाते पुन्हा जोडण्याकरिता आणि जैववैविध्याचा ऱ्हास वाचविण्याकरिता स्थानिक पातळीपासून जागतिक पातळीपर्यंत प्रयत्न झाले. संयुक्त राष्ट्र अंतर्गत १९९२ साली झालेले Convention on Biological Diversity हा जैवविविधतेचे संरक्षण आणि समुचित विकास साधण्याच्या दृष्टीने केलेला एक जागतिक स्तरावरील प्रयत्न आहे. भारताने देखील प्रेरित होऊन २००२ साली जैविक विविधता कायदा संपूर्ण भारताकरिता घोषित केला. जैविक विविधतेचे संरक्षण, संसाधनांचा आणि त्यासंबधित ज्ञानाचा समुचित उपयोग तसेच ह्यातून मिळणाऱ्या फायद्याचे योग्य आणि समान वाटप हा कायद्याचा प्रमुख उद्देश दिसतो. इथे स्थानिक पातळीवर जैवविविधता व्यवस्थापन समित्या स्थापन करायच्या आहेत. तसेच राज्य पातळीवर राज्य जैविक विविधता मंडळ आणि राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण अशा विविध टप्प्यांवर आपल्या जैविक विविधतेचे काळजी घेण्याची रचना ह्या कायद्यानुसार करण्यात आली. स्थानिक पातळीवर तयार झालेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीचा जैविक विविधता संरक्षणात खूप मोठा वाटा आहे. स्थानिक लोक समूहानेच अनेक वर्षे तिथल्या स्थानिक जैविक विविधतेचे संरक्षण आणि दैनंदिन जीवनातील गरजा भागविण्याकरिता उपयोग केला आहे. त्यामुळेच त्यांच्या अधिकारात येणाऱ्या क्षेत्रातील कुठल्याही जैविक संसाधनाचा उपयोग करायचा असल्यास राज्य आणि केंद्र पातळीवरून त्यांच्याशी पहिली सल्ला मसलत होणे आवश्यक केले आहे. ह्याकरिता गावपातळीवर/स्थानिक पातळीवर स्थापन झालेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीने आपल्या अधिकार क्षेत्रातील जैविक विविधतेची विस्तृत नोंदवही बनविणे गरजेचे आहे. जेणेकरून कुठल्या वनस्पती व प्राणी आपल्या आसपास आहेत, त्यांचा स्थनिक पातळीवर कसा उपयोग होतो आणि त्या संबंधी आपले काय ज्ञान आहे ह्याची लेखी नोंद तयार होईल आणि आपोआपच त्यांच्या संरक्षणाचे महत्व अधोरेखित होईल. ह्या नोंदवह्या बनविताना गावातील ज्येष्ठ व्यक्ती, वैदू,पारंपारिक पीक वाण व गुरांच्या प्रजाती माहिती असलेल्या लोकांची खूप महत्वाची भूमिका आहे. ह्या नोंदवह्या बनविताना गावातील ज्येष्ठ व्यक्ती, वैदू,पारंपारिक पीक वाण व गुरांच्या प्रजाती माहिती असलेल्या लोकांची खूप महत्वाची भूमिका आहे. नोंदवही बनविताना गावात घेण्यात येणाऱ्या सर्व पारंपारिक व संक्रमित पिकांचे वाण,

## *चला करूया जैविक विविधता नोंदवही!!*

पशूंच्या प्रजाती, औषधी वनस्पती, इंधन वनस्पती, जंगली झाडे, पशु-प्राणी इत्यादी जमिनीवरील व पाण्यातील जैविक विविधतेची माहिती जमा करायची आहे. त्यासंबंधी माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव देखील नोंदवहीत लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. ह्याचबरोबर गावातील भौगोलिक वैशिष्ट्ये , पाणवठे व त्याचे उपयोग इत्यादीची नोंद देखील ठेवायची आहे. शाळेतील विद्यार्थी, जवळच्या कॉलेजमधील तज्ञ मंडळी ह्यांची मदत शास्त्रीय नावे समजून घेण्याकरिता जरूर घ्यावी. अशी नोंदवही तयार करणे ही जशी समितीची जबाबदारी आहे तसेच गावातील प्रत्येकाने ह्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेणे हे सुद्धा गरजेचे आहे.

कायद्याच्या सहाय्याने अशी नोंदवही बनविणे आता अपरिहार्य आहे. पण त्याचबरोबर प्रत्येक जण आपापल्या स्तरावर जैविक विविधतेबद्दल नोंद ठेऊ शकतो. कुणी त्याच्या रहिवासी सोसायटीकरिता करेल तर काही विद्यार्थी आपल्या शाळेची जैविक नोंदवही तयार करू शकतील. जेणेकरून परत एकदा परिसराशी नाते घट्ट होईल आणि हे कसल्या बडग्याखाली न करता आपणहून केल्यास ती जाणीव टिकायला देखील मदत होईल.

**- अमृता जोगळेकर**
**पर्यावरण अभ्यासक**

**- मेधावी तडवळकर**
**पर्यावरण अभ्यासक**

## *पूर्णमविषयी प्रतिक्रिया*

मी कमोडोर उदय तळवेलकर, भारतीय नौदलातील एक सेवानिवृत्त अधिकारी. माझ्या एका मित्राकडून मला कळले की संघाला वेगवेगळ्या कामांसाठी स्वयंसेवकांची गरज आहे. त्यानुसार मी मित्राला कळविले. दोन दिवसात आमच्या भागातील संयोजक श्री आठवले यांचा फोन आला आणि पूर्णम् इको मधे फेस मास्क बनविण्यात मदतीसाठी स्वयंसेवक म्हणून माझे काम सुरू झाले. सुमारे महिनाभर मी काम केले. ह्या कामात अनेक छान अनुभव आले. Grass root शी घट्ट संबंध असलेली संघटना मी जवळून अनुभवली. कामातलं नियोजन, स्वयंसेवक आणि संस्थेतील माणसं यांची जमलेली उत्तम टीम, वितरण व्यवस्थेतील सुसूत्रता, ह्या कामानिमित्त समाजातील दुर्बल घटकांना जाणीवपूर्वक केलेली मदत, इत्यादी अनेक हृद्य अनुभव माझ्या गाठीशी आहेत. एकूणच हा एक संस्मरणीय अनुभव होता. संस्था उत्तम काम करत आहे. संस्थेला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**- कमोडोर उदय तळवेलकर**
**स्वयंसेवक, पूर्णम इकोव्हीजन फाऊंडेशन**

# *पूर्णमविषयी प्रतिक्रिया*

१० एप्रिलच्या संध्याकाळी संघ-यंत्रणेतून निरोप मिळाल्यावर राजेशजींशी संपर्क साधला आणिपूर्णम इकोव्हिजनशी काही कालावधीसाठी का होईना पण प्रत्यक्षपणे जोडलो गेलो. त्याच दिवशी त्यांच्या कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष कामाची माहिती करून घेतली. पहिल्या भेटीतच राजेशजींच्या 'साधी राहणी उच्च विचारसरणी' चा प्रत्यय आला. त्यामुळे आपुलकी आणि आदर आणखी वाढला. आम्ही एकत्र बसून कापड वितरण आणि तयार मास्क जमा करण्यासंदर्भात पुढील विस्तृत नियोजन केले. त्यानुसार मग मी नगरातील स्वयंसेवकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आणि पुढील नियोजन व कार्यवाही केली. १२ एप्रिलपासून आम्ही ५ जणांनी मास्कसाठी लागणाऱ्या कापडाची मोजून-मापून तयार केलेली कात्रणे वितरण करायला सुरुवात केली. दरम्यान काही अडचणी आल्या पण राजेशजींसमवेत पूर्णमच्या अन्य कर्मचाऱ्यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले त्यामुळे सगळे नीट निभावून गेले.

पूर्वनियोजित शिवणकाम करून देणाऱ्या महिलांशी संपर्क साधणे, त्यांच्यापर्यंत कापडांची कात्रणे पोचविणे, परस्परांच्या सूचनांचे आदान-प्रदान करणे, शंका निरसन करणे, तयार झालेले मास्क ताब्यात घेणे, पुन्हा कार्यालयात येऊन रोजच्या रोज सगळे विवरण देणे असे कामाचे स्वरूप होते. ह्याव्यतिरिक्त दैनंदिन काही अन्य स्वयंसेवक तसेच परिसरातील प्रभात शाखेतील २~३ स्वयंसेवक पूर्णमच्या कर्वेनगरमधील कार्यालयात बसून पडेल ते काम करून विशेष योगदान देत होते.

पूर्णमच्या सर्वच सहकाऱ्यांसमवेत काम करताना एकदाही परकेपणा, भिडस्तपणा जाणवला नाही. अतिशय मोकळे वातावरण, आम्हां कार्यकर्त्यांवरील विश्वास आणि व्यावहारिक पारदर्शकता यामुळे कामाचा कधीही ताण वाटला नाही. प्रत्यक्ष कामातून आलेल्या अनुभवांमुळे आमच्याकडून देण्यात येणाऱ्या सल्ल्यांना कधी डावलण्यात आले नाही तर त्यावर विस्तृत चर्चा होऊन नेहमीच व्यावहारिक उपाय काढण्यात येत होते. कोरोनामुळे उद्‌भवलेल्या टाळेबंदीमुळे (लॉकडाऊन) अनेकांचे अनेक प्रकारे हाल होत होते हे सर्वश्रुत आहेच. पुण्यात सुद्धा रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत होती. अशा परिस्थितीत सुद्धा सामाजिक भान बाळगून राजेशजींसह त्यांच्या कर्मचाऱ्यांनी नितांत गरज असताना वैयक्तिक प्राथमिकता बाजूला ठेवून दैनंदिन किमान १० तास एकही सुट्टी न घेता न थकता कामाचा झपाटा सुरूच ठेवला होता. अशाप्रकारे चांगला हेतू, योग्य नियोजन, प्रसन्न वातावरण, पारदर्शक व्यवहार, वृद्धिंगत क्षमता, स्वयं-प्रेरणा आणि उत्तम व्यवस्थापन असेल तर फलित नक्कीच गोड असणार ह्यात शंकाच नाही. पूर्णमने पूर्वानुभव नसून देखील कठीण प्रसंगी हे आव्हान स्विकारुन आत्तापर्यंत अंदाजे ५० हजार कापडी मास्क तयार करून वितरीत केले हे निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांचे मनापासून धन्यवाद आणि पुढील सर्व योजनांसाठी अनेक शुभेच्छा !

**- श्री. उमेश गानू**
**स्वयंसेवक, पूर्णम इकोव्हीजन फाऊंडेशन**

## सहयोगी संस्था

## पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन

रत्नप्रभा बंगला, महा इ-सेवा केंद्राजवळ, पांचाली स्वीट लेन, कै. दिगंबर हरिभाऊ जाधव रोड, वडगाव बु. गावठाण,

सिंहगड रोड, पुणे - ४११०४१, संपर्क क्रमांक- +91-9405391980 , इ-मेल- contact@poornamecovision.org,

वेबसाईट- www.poornamecovision.org